मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**मराठी भाषा विभाग**
**राज्य मराठी विकास संस्था**
**एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,**
**धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६**
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in
इ-पत्ता **rmvs_mumbai@yahoo.com**, project3.rmvs@gmail.com

# आवाहन

## महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी साहित्य संस्था/मंडळांसाठी अर्थसाहाय्य योजना - सन २०२५-२६

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागात मराठी भाषेचा विकास, संवर्धन, संगोपन आणि अभिवृद्धी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी साहित्य संस्था/मंडळांसाठी अर्थसाहाय्य करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार दिनांक १४.०६.२०२२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागात मराठी भाषा संस्कृती व विकास यासाठी महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागात कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त मराठी साहित्य संस्था /मंडळे सदर शासन निर्णयातील परिच्छेद २ (२) मध्ये नमूद केलेल्या अटी-शर्तीच्या अधीन राहून अर्थसाहाय्य/ अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील, महाराष्ट्र शासनाने दि. १० जुलै २००८ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषेचा विकास, संवर्धन, संगोपन आणि अभिवृद्धी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या राज्य मराठी विकास संस्थेतर्फे **महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी साहित्य संस्था/मंडळे ह्यांना अर्थसाहाय्य करण्यात येणार आहे.**

त्यानुसार "महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी भाषा संस्कृती व विकास यासाठी अर्थसाहाय्य" ही योजना मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त राज्य मराठी विकास संस्था यांच्या मार्फत राबविण्यात येत आहे.

मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. कसीयो-१०१२/प्र.क्र.१३९/२०१२/भाषा-३, दि. २१.०१.२०१३ अन्वये महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी भाषेचा विकास, संवर्धन, संगोपन आणि अभिवृद्धी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनातर्फे एक खास बाब म्हणून महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी साहित्य संस्थांना शासनाच्या अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या/ पात्र ठरणाऱ्या मराठी साहित्य संस्था/मंडळांना अर्थसाहाय्य करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील, महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषेचा विकास, संवर्धन, संगोपन आणि अभिवृद्धी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या राज्य मराठी विकास संस्थेतर्फे महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी साहित्य संस्थांना सन २०२५-२६ मध्ये १ कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य करण्यात येणार आहे.

राज्य मराठी विकास संस्थेने या योजनेअंतर्गत, निश्चित केलेल्या विहित कार्यपद्धती व निकषांना अनुसरून महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त पात्र मराठी साहित्य संस्था/मंडळांना रु. १०.०० लक्षच्या कमाल मर्यादेत अनुदान करण्यात येणार आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी या याजनेंतर्गत दिनांक १०/०७/२०२५ ते १०/०८/२०२५ या कालावधीत, विहित नमुन्यात गुगल अर्जाद्वारे (Google Form) महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी साहित्य संस्था/मंडळांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

या योजनेची कार्यपद्धती व निकष, मार्गदर्शक सूचना, विहित अर्जाचा नमुना इतर तपशील राज्य मराठी विकास संस्थेच्या https://rmvs.marathi.gov.in या तसेच महाराष्ट्र शासनाच्या http://maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर **"महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी भाषा संस्कृती व विकास यासाठी अर्थसाहाय्य योजना"** या शीर्षकाखाली उपलब्ध करून देण्यात आले आहेत. कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**“महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मंडळे/ मराठी साहित्य संस्थांना अर्थसाहाय्य योजना”**
**कार्यपद्धती व निकष – सन २०२५-२६**

**(अ) महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मान्यता प्राप्त मंडळे/मराठी साहित्य संस्था यांना अर्थसाहाय्य देण्याबाबतची कार्यपद्धती :-**

१) महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त मंडळे/मराठी साहित्य संस्थांना अर्थसाहाय्य देण्याच्या अनुषंगाने राज्य मराठी विकास संस्थेने जाहिरात देऊन अर्ज मागवावेत व विहित कालमर्यादेनंतर येणाऱ्या अर्जांचा अर्थसाहाय्यासाठी/ अनुदानासाठी विचार केला जाणार नाही, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करावा.

आर्थिक वर्ष २०२२-२३ या वर्षापासून सदर योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेची जाहिरात मार्च- एप्रिल महिन्यात प्रसिध्द करुन **महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मंडळे**/मराठी साहित्य संस्थांकडून अर्ज मागविण्यात यावेत.

**संस्थेच्या नियोजनानुसार या योजनेची जाहिरात देऊन अर्ज मागवण्याचा दिनांक व कालावधी यात बदल करण्याचे अधिकार संस्थेला असतील.** सदर जाहिरात/ निवेदन राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग तसेच महाराष्ट्र शासन यांच्या संकेतस्थळांवरही प्रसिध्द करावी.

२) सदर जाहिरातीस अनुसरून महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मंडळे/ मराठी साहित्य संस्था यांनी त्यांचा प्रकल्प/ उपक्रम/ योजना यांबाबतचे सविस्तर टिपण (अंदाजित आर्थिक तपशिलासह) परिशिष्ट अ मध्ये जोडलेल्या विहित अर्जासह राज्य मराठी विकास संस्थेकडे विहित कालमर्यादेत पाठविणे आवश्यक आहे.

३) राज्य मराठी विकास संस्थेने, प्राप्त झालेले अर्ज या योजनेंसाठी तयार केलेल्या निवड समितीसमोर छाननीसाठी ठेवावेत. या निवड समितीने मान्यता दिलेल्या पात्र संस्था / मंडळे यांना प्रकल्प व वित्त समितीची मान्यता घेऊन, कार्यकारी समितीच्या बैठकीत अंतिम निवड करण्यासाठी सादर करावेत व सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या, पात्र ठरलेल्या मराठी साहित्य संस्थांना संस्थेच्या प्रचलित धोरणानुसार अर्थसाहाय्य/ अनुदान वितरित करावे.

**(आ) अर्थसाहाय्यासाठी/ अनुदानासाठी अर्ज करणाऱ्या मंडळे/संस्थांकरिता/ मंडळांकरिता निकष, अटी व शर्ती :-**

१) राज्य मराठी विकास संस्थेकडे प्राप्त होणाऱ्या, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मंडळे/ मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त मराठी साहित्य संस्थांच्या तसेच महाराष्ट्राबाहेर मराठी ग्रंथप्रकाशनाचे दर्जेदार कार्य करणाऱ्या संस्थांच्या अर्जांचा अर्थसाहाय्यासाठी/ अनुदानासाठी विचार करण्यात येईल.

२) अर्जदारांनी विहित नमुन्यात व विहित कालावधीत अर्ज राज्य मराठी विकास संस्थेकडे सादर करणे बंधनकारक राहील.

३) संस्थेची इमारत स्वत:ची आहे किंवा भाड्याची आहे यांसंबंधीची कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक राहील.

४) मालकी हक्काने चालविण्यात येणाऱ्या संस्थेला अनुदान देण्यात येणार नाही.

५) या योजनेअंतर्गत कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम किंवा स्थावर मालमत्ता निर्माण करण्यासाठी अर्थसाहाय्य दिले जाणार नाही. जर एखाद्या अर्जदार संस्था अथवा मंडळाची प्रस्तावित योजना अथवा उपक्रम हा मंडळासाठी जमीन विकत घेणे, कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम करणे अथवा अन्य स्वरूपाची स्थावर मालमत्ता निर्माण करण्यासंदर्भातील असेल तर त्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

६) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्याकडून ज्या बाबींसाठी अर्थसाहाय्य देण्यात येते त्यांसाठी या योजनेअंतर्गत अर्थसाहाय्य दिले जाणार नाही.

७) या योजनेंतर्गत अर्थसाहाय्य मिळण्याच्या अनुषंगाने अर्जदार मराठी साहित्य संस्था यांनी परस्पर महाराष्ट्र शासनाच्या इतर कोणत्याही विभागास वा मंडळास अर्ज सादर न करता, विहित नमुन्यात व विहित कालावधीत राज्य मराठी विकास संस्थेकडे सादर करणे बंधनकारक राहील.

८) अर्जदार संस्था/मंडळे, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० आणि सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत धर्मादाय आयुक्तांकडे, तसेच सोसायटी कायदा व कंपनी कायदा कलम ८ अन्वये संबंधित प्राधिकरण अथवा विभागाकडे नोंदणीकृत असाव्यात. मालकी हक्काने चालविण्यात येणाऱ्या संस्था/ मंडळे अर्थसाहाय्यास/ अनुदानास पात्र असणार नाहीत.

९) अर्थसाहाय्यासाठी/ अनुदानासाठी अर्ज करणारी महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील साहित्य संस्था किंवा मंडळ किमान ५ वर्षे मराठी भाषा, साहित्य वा प्रकाशन क्षेत्रांमध्ये कार्यरत असणे आवश्यक आहे.

१०) सदर संस्था ह्या बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली या शिखर संस्थेशी संलग्न असणे बंधनकारक आहे.

११) अर्जदार संस्था यांनी अर्जासोबत प्रस्तावित उपक्रमाचे सविस्तर प्रकल्प टिपण (Detail Project Note), सविस्तर आर्थिक अंदाजपत्रकासह पाठविणे बंधनकारक आहे. संक्षिप्त वा केवळ प्रकल्प विषय नमूद केलेले टिपण विचारात घेतले जाणार नाहीत. प्रकल्पासाठी येणाऱ्या खर्चासाठीचा स्वहिस्सा कसा उभारणार याबाबतचा सविस्तर तपशील देखील टिपणीसोबत जोडणे आवश्यक असेल.

१२) अर्जदार मंडळे/ संस्था यांनी अर्जासोबत अर्जाच्या दिनांकापूर्वीच्या पाच वर्षांच्या कामाचा अहवाल जोडणे आवश्यक राहील.

१३) राज्य मराठी विकास संस्थेतर्फे मंजूर होणारे अर्थसाहाय्य/ अनुदान फक्त त्या एका संबंधित आर्थिक वर्षासाठी असेल व यासंदर्भातील अनुदानाचे सर्वसाधारण नियम व अटी संस्थांना लागू होतील.

१४) अर्जदार संस्थेने आपले ध्येयधोरण स्पष्ट केल्यानंतर व यासंदर्भातील अर्थसाहाय्यासाठीचा/ अनुदानासाठीचा प्रस्ताव सादर केल्यावर त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

१५) अर्जदार संस्थेने ज्या विषयासंदर्भात अर्थसाहाय्यासाठीचा/ अनुदानासाठी अर्ज केला आहे

त्याविषयासाठी इतर कोणत्याही शासकीय, निमशासकीय विभागाने/ संस्थेने/ मंडळाने अर्थसाहाय्य केलेले नसावे.

१६) अर्जदार संस्थेने मागील किमान ३ वर्षांचे सनदी लेखापालाने (Chartered Accountant) लेखापरीक्षित केलेले लेखा अहवाल राज्य मराठी विकास संस्थेकडे सादर करणे आवश्यक राहील. सनदी लेखापाल अर्जदार संस्थेचा/ मंडळाचा सदस्य नसावा.

**१७) महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील, महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांव्यतिरिक्त गावांतील मराठी भाषेचा विकास, संवर्धन, संगोपन आणि अभिवृद्धी होण्याच्या दृष्टीने कार्यरत असणाऱ्या संस्था / मंडळे यांनी राज्य मराठी विकास संस्था राबवित असलेल्या 'बृहन्महाराष्ट्र मंडळे अर्थसाहाय्य योजना' या अंतर्गत विहित कार्यपद्धती अनुसरून अर्ज करावा.**

**(इ) अनुदान / आर्थिक साहाय्याचे टप्पे व अटी आणि शर्ती :-**

१) अर्जदार संस्थेने आपले ध्येयधोरण एकदा स्पष्ट केल्यावर त्या ध्येयधोरणानुसारच संबंधित उपक्रम / प्रकल्प यांचे काम होणे आवश्यक राहील. ते ध्येयधोरण साधण्याच्या दृष्टीने संबंधित वर्षात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व त्या वर्षातील जमा खर्चाचा तपशील विनियोजन विवरण पत्रासोबत विहित कालमर्यादेत वर्ष अखेरपर्यंत राज्य मराठी विकास संस्थेस देणे आवश्यक राहील. अन्यथा सदर संस्था पुढील वर्षा अनुदान मंजूरीसाठी अपात्र ठरेल.

२) ज्या प्रयोजनासाठी निधी दिला आहे तो त्याच प्रयोजनासाठी खर्च करावा लागेल. वितरित केलेल्या अनुदान साहाय्याच्या खर्चाचा हिशोब शासनमान्य अधिकृत लेखापालाकडून सादर करणे बंधनकारक राहील.

३) राज्य मराठी विकास संस्थेकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यबाबत महालेखापाल, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर यांच्या यंत्रणेकरवी लेखा परीक्षण करण्यात पात्र असेल. अर्थसाहाय्याबाबतची सर्व कागदपत्रे व हिशोब महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई किंवा त्याचें अधिकारी यांना तपासण्याचा अधिकार असून त्यांनी मागणी केल्यास सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणीसाठी सादर करणे आवश्यक राहील.

४) संस्थेला/ मंडळाला देण्यात येणारे अनुदान किती रकमेचे असावे याबाबत सदर योजने अंतर्गत गठित केलेल्या निवड समितीचा अंतिम निर्णय राहील.

५) प्रतिवर्षी प्राप्त झालेले अनुदान यापुढेही प्राप्त होईल असे संस्थेतर्फे गृहित धरण्यात येऊ नये.

६) जे अर्थसाहाय्य मंजूर करण्यात येईल, ती अनुदानित रक्कम एकाच वेळी १०० टक्के वितरित केली जाणार नाही तर त्या अनुदानित रकमेचे दोन टप्प्यात (मंजूरीनंतर ६० टक्के व उपक्रम पार पडून संबंधित संस्था / मंडळ यांनी प्रकल्पाशी संबंधित सर्व कागदपत्रे राज्य मराठी विकास संस्थेस सादर केल्यानंतर शेवटी ४० टक्के) वितरण "आभासी वैयक्तिक ठेव लेखा" (व्ही.पी.डी.ए) प्रणालीद्वारे सदर मराठी साहित्य संस्थांच्या बँक खात्यात केले जाईल. यासाठी आपल्या संस्थेच्या बँक खात्याचा रद्द केलेला धनादेश आणि पॅन कार्ड सोबत पाठविणे बंधनकारक राहील.

७) राज्य मराठी विकास संस्थेच्या निकषांनुसार ज्या अर्जदार संस्था अथवा मंडळांना या योजनेअंतर्गत जे अर्थसाहाय्य मंजूर करण्यात येईल त्यासंदर्भातील राज्य मराठी विकास संस्थेचे अधिकृत पत्र, इ पत्रांच्या दिनांकानंतर संबंधित उपक्रम करणे बंधनकारक असेल. अधिकृत पत्र प्राप्त होण्याच्या आधी केलेले उपक्रम अर्थसाहाय्यासाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत.

८) अर्जदार संस्था / मंडळ यांना ज्या प्रकल्पासाठी, उपक्रमासाठी या योजनेअंतर्गत अर्थसाहाय्य मंजूर करण्यात आले आहे, त्या प्रकल्पाच्या, उपक्रमाच्या सर्व साहित्यावर "या उपक्रमास/ प्रकल्पास राज्य मराठी विकास संस्थेतर्फे 'महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात मराठी भाषा संस्कृती व विकास' या अंतर्गत अर्थसाहाय्य प्राप्त झाले आहे." असा स्पष्ट उल्लेख राज्य मराठी विकास संस्थेच्या मुद्रेसह (Logoसह) करणे बंधनकारक असेल.

९) अर्जदार संस्थेस ज्या उपक्रमासाठी, कार्यक्रमासाठी सदर योजनेतून आर्थिक साहाय्य मंजूर करण्यात आले आहे, त्या कार्यक्रमातून, उपक्रमातून निर्माण झालेले साहित्य, ग्रंथ, साधने इत्यादी राज्य मराठी विकास संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे अधिकार राज्य मराठी विकास संस्थेला असतील.

१०)अर्जदार संस्थेने, संस्थेस मंजूर करण्यात आलेल्या अर्थसाहाय्य / अनुदानातून करण्यात येत असलेल्या कामाचा नियतकालिक अहवाल दर तीन महिन्यांनी राज्य मराठी विकास संस्थेस सादर करणे बंधनकारक असेल. अन्यथा सदर संस्था पुढील काळात अनुदान मंजूरीसाठी अपात्र ठरेल.

११)राज्य मराठी विकास संस्थेने ज्या कारणासाठी अर्थसाहाय्य / अनुदान मंजूर केले आहे त्याच कारणासाठी वापरणे बंधनकारक आहे. ते अन्य प्रयोजनासाठी खर्च करता येणार नाही, असे केल्यास ती वित्तीय अनियमितता समजण्यात येईल व अशा संस्था / मंडळ यांच्याविरुद्ध गैरव्यवहाराची कारवाई करण्यात येईल.

१२)राज्य मराठी विकास संस्थेने ज्या कारणासाठी अर्थसाहाय्य / अनुदान मंजूर केले आहे त्याच कारणासाठी वापरणे बंधनकारक आहे. ते अन्य प्रयोजनासाठी खर्च करता येणार नाही, असे केल्यास ती वित्तीय अनियमितता समजण्यात येईल व अशा संस्थांच्या विरुद्ध गैरव्यवहाराची कारवाई करण्यात येईल.

१३)राज्य मराठी विकास संस्थेने दिलेल्या निधीचा उपयोग विशिष्ट कारणासाठीच करण्यात येणार असल्याचे उपयोजन प्रमाणपत्र (Utilization Certificate) अर्जदार संस्थेने/ मंडळाने देणे बंधनकारक राहील.

१४) राज्य मराठी विकास संस्थेने दिलेल्या अर्थसाहाय्याच्या/ अनुदानाच्या खर्चाचा हिशोब शासनमान्य अधिकृत लेखापालाकडून सादर करणे अर्जदार संस्थेस बंधनकारक राहील. तसेच त्या वर्षातील जमाखर्चाचा तपशील, खर्चाची मूळ देयके तसेच पावत्या, विनियोजन विवरणपत्रासह विहित कालमर्यादेत, अनुदान मंजूरीच्या वित्तीय वर्ष अखेरपर्यंत राज्य मराठी विकास संस्थेस सादर करणे आवश्यक राहील.

१५) फक्त रु. ५००० इतक्या रकमेच्या मर्यादेतील खर्चाची खर्च पावती (व्हाऊचर) ग्राह्य धरण्यात येईल. त्यापुढील खर्च रकमेचे मूळ देयक पाठवणे बंधनकारक असेल.

१६) वरील निकषांच्या आधारे अर्जदार संस्थांची निवड करण्याचे सर्व अधिकार राज्य मराठी विकास संस्थेस असतील.

**(ई) अर्थसाहाय्य / अनुदान मिळण्यासाठी मंडळे /संस्था यांसाठी उपक्रमांचे स्वरूप:-**

सदर योजनेची अंमलबजावणी उपरोक्त कार्यपद्धती व निकष तसेच अर्थसाहाय्यासाठी अर्ज करणाऱ्या महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी साहित्य संस्था यांसाठीच्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे ठरविण्यात येत आहेत.

मराठी भाषा विभागातर्फे शासन परिपत्रक क्र.ममंटि-२०१७/प्र.क्र.१३५/अर्थसंकल्प, दि. ३०.११.२०२२ रोजी "महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागात मराठी भाषा संस्कृती व विकास यासाठी अर्थसाहाय्य योजना' प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत निर्गमित झालेल्या शासन निर्णयात महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी भाषिक संस्थांनी आपापल्या कार्यक्षेत्रात राबवाववयाचे उपक्रमाचे स्वरूप नमूद केले आहे. सदर उपक्रम खालीलप्रमाणे आहेत.

१. मराठी साहित्याची ओळख व मराठी साहित्याविषयी वाचकांचे प्रेम वाढावे म्हणून महाराष्ट्र-कर्नाटक या राज्यातीला नामवंत साहित्यिक, विचारवंत, कथाकार, कवी यांची व्याख्याने आयोजित करणे तसेच मराठी भाषातील दर्जेदार साहित्य उपलब्ध करुन देणे.
२. संमेलनाच्या माध्यमातून संस्कारक्षम मराठी भाषेतील पुस्तके अल्प दरात वाचकांस उपलब्ध करुन देणे.
३. ना-नफा ना तोटा तत्त्वावर मराठी भाषेतील पुस्तकाच्या प्रकाशनास मदत करणे व विक्रीस उपलब्ध करुन देणे.
४. मराठी भाषा संस्कृती लिपी यांचे संरक्षण, संवर्धन करणे आणि मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करणे.
५. मराठी बाल, युवा व प्रौढ साहित्य संमेलनाचे आयोजन करणे.
६. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषा विषयक स्पर्धा परीक्षा आयोजित करणे व त्यासाठी अभ्यासिका केंद्राची उभारणी करणे.
७. मराठी भाषा व साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या व्यक्तीचा पुरस्कार देऊन सन्मान करणे.
८. ग्रामीण भागात मराठी वाङ्मयीन कार्यक्रमाचे आयोजन करणे.
९. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात प्रसिद्ध होणारे व मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी कार्य करणारे वृत्तपत्र, नियतकालिक, पाक्षिक यांस अनुदान देणे,
१०. संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाच्या योजनाचा खर्च व त्याअनुंषंगिक होणारा खर्च भागविणे.
११. मराठी भाषा विषय शिकविणाऱ्या मान्यताप्राप्त शिक्षक संघटनांना भाषेचे विविध उपक्रमांतर्गत निबंधस्पर्धा, चर्चासत्रे, कार्यशाळा, नाट्यस्पर्धा यांच्या आयोजनासाठी अर्थसहाय्य करणे.

उपरोक्त उपक्रमांसदर्भात सदर अनुदानाचे वाटप उपक्रमनिहाय होणाऱ्या अनुषंगाने खालील बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

१. उपरोक्त नमूद ११ उपक्रमांपैकी प्रत्येक उपक्रमास कमाल रु. १.०० लक्ष मर्यादेत अनुदान मंजूर करण्यात येईल.

२. एका मराठी भाषिक संस्थेने/मंडळाने एकापेक्षा जास्त उपक्रम राबविण्याचे ठरविल्यास अशा उपक्रमांसाठी मिळून रु.१०.०० लक्ष च्या कमाल मर्यादेत अनुदान मंजूर करण्यात येईल.

**(३) उपक्रमांसंदर्भात काही मार्गदर्शक सूचनाः-**

१) मराठी भाषेचे अंगभूत सामर्थ्य ओळखून, आधुनिक गतिमान युगातील आव्हाने पेलण्यासाठी मराठी भाषा ही ज्ञानभाषा म्हणून सर्वांगाने विकसित करण्याचा विचार व प्रयत्न व्हावा.

२) मराठी भाषा, बोली या विषयांसदर्भातील नावीन्यपूर्ण दिशादर्शक संशोधन, पुस्तके, कोश, संगणकीय साधने (सॉफ्टवेअर्स, ॲप्स इ.) व संगणकीय सामग्री (ध्वनिमुद्रिते, चित्रिकरणे, संगणकीय मजकुर इ.) तयार करून ती प्रसिद्ध करण्याच्या प्रयत्न करावा.

३) महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मंडळ/ संस्था कार्यरत आहे त्या भागांमध्ये बोलल्या जाणाऱ्या मराठीच्या बोली भाषा, साहित्य व संस्कृतीचा विचार करून त्यासंदर्भातील विविध उपक्रम राबविण्याचा प्रयत्न व्हावा.

४) केवळ साहित्यावरील चर्चा व परिसंवाद एवढेच कार्यक्रमाचे स्वरूप असू नये तर मराठी भाषा आणि इतर भारतीय भाषा यांच्यामध्ये परस्पर साहित्य तसेच भाषिक व्यवहार वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे.

५) विविध ज्ञानशाखांमधील अद्ययावत ज्ञान मराठी भाषेत येण्यासाठी अनुवाद, भाषांतर, परिभाषा निर्मिती, सर्वेक्षणे यांसदर्भात विविध उपक्रमांचे आयोजन करावे.

६) त्या त्या राज्यांतील शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मराठी भाषा व साहित्याची गोडी लागावी यासाठी विविध प्रकारची शालेय साधने, संदर्भसाधने यांची निर्मिती करावी तसेच वाचनसंस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करावे.

७) राज्य मराठी विकास संस्थेच्या उद्दिष्टांना पूरक असे उपक्रम, योजना राबवाव्यात.

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाने दि. १४ जून २०२२ रोजी निर्गमित केलेल्या क्रमांक- ममंटि/२०१७/प्र.क्र. १३५/अर्थसंकल्प या शासन निर्णयात तसेच वरील परिपत्रकात नमूद केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या आणि अनुदान/अर्थसाहाय्यास पात्र ठरणाऱ्या महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मान्यताप्राप्त मराठी साहित्य संस्थाना जास्तीत जास्त रु. १०.०० लक्ष एवढ्या कमाल मर्यादेपर्यंत अर्थसहाय्य/अनुदान अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

# परिशिष्ट – अ

## महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी साहित्य संस्था/मंडळे यांनी अर्थसाहाय्यार्थ/ अनुदानार्थ करावयाच्या ऑनलाईन अर्जाचा नमुना

(गुगल अर्जाद्वारेच अर्जदारांनी (Google Form) अर्ज भरणे बंधनकारक आहे. सदर अर्थसाहाय्याचे गुगल अर्जचा (Google Form) नमुना पुढील प्रमाणे आहे. गुगल अर्जाद्वारे (Google Form) दि.१०/०७/२०२५ ते १०/०८/२०२५ या कालावधीत पर्यत अर्ज मागविण्यात येत आहे. कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.)

१) मराठी साहित्य संस्थेचे नाव व पत्ता (संपर्क क्रमांक व इ-पत्त्यासह) :-

२) मराठी साहित्य संस्थेचा नोंदणी क्रमांक व दिनांक :-

३) मराठी साहित्य संस्थेचे स्वरूप, कार्यक्षेत्र व उद्देश :-

४) मंडळाची/ संस्थेची घटना/ नियमावली आहे का? असल्यास, त्यास शासन मान्यता आहे काय? (घटनेची प्रत जोडावी. - जोडपत्र -१) :-

५) मराठी साहित्य मंडळाला कार्यकारी मंडळ आहे काय? असल्यास, कार्यकारिणीच्या सदस्यांची नावे व पत्ते (यादी सोबत जोडावी. - जोडपत्र – २) :-

६) मंडळ / संस्था यांच्या मागील ३ वर्षातील योजना, कार्यक्रम यासंबंधीचे तपशील (जोडपत्र – ३) :-

७) प्रस्तावित प्रकल्प/ उपक्रम/ योजना यांचे संक्षिप्त वर्णन (अंदाजित आर्थिक तपशिलांसहित प्रकल्पाचे सविस्तर टिपण अर्जासोबत जोडावे. – जोडपत्र – ४) :-

८) प्रस्तावित प्रकल्प/ उपक्रम/ योजना यांना इतर शासकीय विभाग, निमशासकीय अथवा खाजगी संस्था/ मंडळे यांचे अनुदान मिळाले आहे काय ? असल्यास माहिती द्यावी. :-

९) सनदी लेखापालाकडून संस्थेचे लेखापरीक्षण करून घेतलेले आहे काय? असल्यास, मागील तीन वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची प्रत सादर करावी. (जोडपत्र – ५) :-

१०) मंडळ/ संस्था अर्थसाहाय्यास/ अनुदानास पात्र ठरल्यास अर्थसाहाय्याची रक्कम ऑनलाईन जमा करण्यासाठी (VPDA प्रणाली) संस्थेच्या बँकखात्याचा अचूक तपशील (इंग्रजी व मराठी) :-

खातेधारकाचे नाव -
बँकेचे नाव -
शाखा -
खाते क्रमांक -
IFSC -
MICR -
संपर्क क्रमांक -

प्रमाणित करण्यात येते की, मंडळातर्फे/ संस्थेतर्फे देण्यात आलेली वरील सर्व माहिती सत्य आहे. सदर माहिती खोटी किंवा चुकीची असल्याचे आढळून आल्यास, संस्था कार्यवाहीस अपात्र ठरविण्यात यावी व सदरहू मंडळास/ संस्थेस कोणत्याही प्रकारचे अर्थसाहाय्य देऊ नये किंवा यापुढेही देण्यात येऊ नये.

दिनांक :
ठिकाण :

आपला,

( )
अध्यक्ष/ सचिव

संस्थेचा/ मंडळाचा शिक्का